**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED JOURNAL, OCT-NOV 2018, VOL- 6/30*

# पुणे शहरातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा अभ्यास व उपाय

**बापूसाहेब गणपत चौ [१], Ph.D. & कु. माळी रुपाली बबनराव [२]**
[१]*अध्यापक महाविद्यालय,अरण्येश्वर, पुणे ४११००९*
[२]*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे पीएच. डी. शिक्षणशास्त्र विभाग सन २०१८–१९*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १) प्रस्तावना :

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली आहे. मानवाने तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे. या भौगोलिक परिस्थितीशी मानवाने कसे मिळते जुळते घेतले आहे हे सांगणारे शास्त्र म्हणजे भूगोल होय. भूगोल हा शालेय विषयातील सामाजिक शास्त्रे व भौतिक शास्त्रे यांना जोडणारा परंतु त्यांच्यापेक्षा वेगळा असणारा विषय आहे. त्याचा इतर सर्व शालेय विषयांशी घनिष्ठ संबंध आहे. विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन शालेय स्तरापासून विकसित होणे आवश्यक आहे.

भौगोलिक दृष्टिकोन म्हणजे नेमके काय ? हे विद्यार्थी व शिक्षकांनीही समजून घेणे महत्त्वाचे आहे केवळ शिक्षकांनी भूगोल विषयाचे अध्यापन करणे व विद्यार्थ्यांनी भूगोल विषयाचे अध्ययन करणे नव्हे तर भूगोल अध्ययन अध्यापनातून भौगोलिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार पद्धती, भौगोलिक अभिवृत्ती, भूगोलाचे व्याकरण म्हणजे भूगोलातील सर्व उपविषय हे गतिमान प्रगतीशील असतात. त्यांचा मानवी जीवनाशी घनिष्ठ संबंध असतो. या गोष्टी साध्य करणे होय. भौगोलिक दृष्टिकोनात भौगोलिक व्यवसाय, निरीक्षण व हस्तव्यवसाय यांचा समावेश, मानवाच्या जीवनाचे निरीक्षण, हवामान निरीक्षण नकाशावाचन (नकाशा निरीक्षण), नकाशा भरणे, भौगोलिक स्थानाची क्षेत्रभेट, चित्रे व बातम्या यांचा संग्रह करणे, विकास योजनांची माहिती घेणे या सर्व बाबी विद्यार्थ्यांमध्ये विकसित होण्यासाठी शालेय स्तरावर विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. उदा. भौगोलिक स्थळांना क्षेत्रभेट, भूगोल प्रकल्प, भौगोलिक प्रदर्शने अशा प्रकारचे उपक्रम शालेय स्तरावर राबविले गेले तर आपोआपच विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित होईल.

## २) संशोधन विषय संकल्पना :

भारत सरकारने १९८६ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहिर केले. या धोरणात एकसमान राष्ट्रीय अभ्यासक्रमाची शिफारस करण्यात आली. त्यानुसार प्रत्येक राज्याच्या सांस्कृतिक, भौगोलिक व ऐतिहासिक वैशिष्ट्यानुसार अभ्यासक्रमात सर्व विषयांच्या पाठ्यक्रमाच्या सुरुवातीस १९६६ च्या मे महिन्यात शासकीयदृष्ट्या मंजूर झालेल्या व १९६८ पासून

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

कार्यवाहीत असलेल्या दहा मूलभूत उद्दिष्टांमधील दुसरे उद्दिष्ट निरीक्षण शोधक वृत्ती आणि स्वाध्याय यांचा विकास व्हावा – हे भूगोल विषयास लागू पडते. यासाठी विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. याविषयी माहिती जाणून घेणे आवश्यक आहे.

**२.१ भौगोलिक दृष्टिकोन :**

भौगोलिक संकल्पना, सिद्धांत व तत्त्वे, घटना, संज्ञा, संबोध, नियम, चिन्हे, परिभाषा व तत्त्वे यांचे आकलन होऊन या विषयात मिळविलेल्या ज्ञानाचा नवीन विविध परिस्थितीत उपयोग करणे हा भूगोल अध्यापनाचा हेतू असतो. भूगोल शिक्षणाची मूलभूत प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे भूगोल विषयाशी संबंधित कौशल्य प्राप्त करणे, स्वयंअभ्यास पृथक्करण, चिकित्सक मूल्यमापन, अभिरुची निर्माण करणे, साहित्य निर्मिती करणे, नियमित व कठोर परिश्रम करण्याची सवय, समस्या निराकरण करणे, प्रयोग व सर्वेक्षण करणे, अर्थ लावणे, अंदाज करणे, परिकल्पनेतील सत्यता पडताळून पाहणे, सांस्कृतिक पार्श्वभूमी व विकासाबाबत योग्य दृष्टिकोन विकतिस होणे, तसेच भौगोलिक घटना किंवा समस्या यांच्याशी संबंधित असलेली माहिती मिळविणे तक्ते, नकाशे, आकृत्या, आलेख इ. चे वाचन करणे, संशोधक, भूगोलतज्ज्ञ व शास्त्रज्ञ यांची भौगोलिक पुस्तके नियतकालिके वृत्तपत्रे, लेख, चरित्रे वाचणे या सर्वच कृतीमधूनच भौगोलिक दृष्टिकोन जोपासला जातो.

**२.२ भौगोलिक दृष्टिकोन :**

१) भूगोलात पृथ्वीवरील वने, नद्या, खनिजे इ. घटकांचा केवळ अभ्यास करावयाचा नसतो तर त्याचा मानवाने आपली बुद्धी, कल्पना याद्वारे आपल्या कल्याणासाठी कसा वापर केला आहे याचाही अभ्यास करावयाचा असतो.

२) पर्यावरणातील भौतिक व सामाजिक घटकांचा त्या त्या भौतिक व सामाजिक शास्त्राप्रमाणे स्वतंत्र अभ्यास न करता मानवाच्या संदर्भात अभ्यास करावयाचा असतो.

३) भूगोलाच्या अभ्यासात मानव हा केंद्रस्थानी असतो. या अभ्यासात पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, खोगलशास्त्र इत्यादी भौतिक शास्त्रे, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र इत्यादी जैविक शास्त्रे व अर्थशास्त्र, वाणिज्य, इतिहास सामाजिक शास्त्रे यांचा संबंध येतो. या संबंधामुळे भूगोलाच्या अनेक शाखा व उपशाखा निर्माण झाल्या आहेत. म्हणून अलिकडे भूगोलास एकत्रीकरणाचे किंवा एकात्मकतेचे शास्त्र असेही म्हणतात.

**२.३ भूगोलाचे व्यापक रुप :**

भूगोल विषय सारखा वाढता, बदलता व गतिमान आहे. हा विषय मानवी जीवनाला व्यापून राहिलेला आहे. म्हणूनच भूगोल विषय हा जिवंत विषय आहे. यात सतत घडामोडी,बदल एकसारखे चालू असतात. भौगोलिक कार्यकारणभाव, भौगोलिक परिस्थिती, मानवी जीवनाचा भौगोलिक परिस्थितीवर पडलेला प्रभाव तसेच भौगोलिक घडोमोडीचा मानवी

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

जीवनावरती झालेला परिणाम त्याचा प्रभाव याची अनुभूती माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना जितक्या लवकर देता येईल तितक्या लवकर या विषयात गोडी घेण्यास विद्यार्थ्यांना उत्साह येईल त्यांचा भौगोलिक दृष्टिकोन विकसित होईल.

**२.४ भौगोलिक दृष्टिकोन निर्मितीचे मार्ग :**

१) प्रात्याक्षिक, प्रयोगशीलता यांवर भर देऊन अध्यापन.

२) भौगोलिक कार्यकारण मीमांसा करण्याची सवय.

३) संशोधक, भूगोलतज्ज्ञ व शास्त्रज्ञ यांची चरित्रे, भौगोलिक पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे व लेख यांचे वाचन तसेच नमुने गोळा करणे, संग्रह करणे यांसारखे छंद जोपासण्यासाठी प्रेरणा उपक्रम देणे.

४) प्रत्येक प्रात्याक्षिक, क्षेत्रभेट, प्रयोगानंतर चर्चा.

५) भूगोल विभाग, भूगोल मंडळीची स्थापना.

६) भूगोल जत्रांचे आयोजन.

७) भूगोल प्रदर्शन – सहभागासाठी प्रेरणा व मार्गदर्शन.

८) भूगोल प्रश्नमंजुषेचे आयोजन

९) टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविण्यासाठी नवनिर्मितीसाठी प्रोत्साहन.

१०) भौगोलिक स्थळांना भेटी.

११) भौगोलिक सहलीचे आयोजन.

१२) भूगोल दिन साजरा करणे.

१३) संशोधक, भूगोल, तज्ज्ञ, शास्त्रज्ञांच्या भेटीचे आयोजन व त्यांच्याशी चर्चा.

१४) संशोधक, भूगोलतज्ज्ञ व शास्त्रज्ञ यांच्या शोधांची माहिती.

१५) चांगल्या कार्याची व कृतीची नोंद व प्रोत्साहन.

१६) भौगोलिक संबोध संकल्पना स्पष्ट होण्यासाठी विविध दृकश्राव्य माध्यमाचा वापर.

१७) भूगोल विषयासंदर्भात व्याख्याने, गटचर्चा, प्रकल्प, कार्यशाळांचे आयोजन.

१८) भौगोलिक स्वतंत्र वर्ग खोली विकसित करणे.

या मार्गांचा अवलंब केल्यास भौगोलिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल.

**३) संशोधनाची गरज व महत्त्व :**

**३.१ गरज :**

संशोधक स्वतः माध्यमिक शाळेत कार्यरत आहे. त्यामुळे भूगोल विषयाचे अध्ययन व अध्यापन करावे लागते. त्यासाठी अध्ययन अनुभव द्यायचे ठरविले असते, परंतु प्रत्यक्ष अध्यापन करताना मूल्य विकसनाचा पाहिजे तेवढा प्रयत्न

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

होऊ शकत नाही. त्यासाठी अध्यापना व्यतिरिक्त कोणकोणते उपक्रम राबविता येतील? त्या उपक्रमांचा परिणाम काय होईल? ते उपक्रम राबवित असताना कोणत्या समस्या येतील? त्या समस्या सोडविण्यासाठी कोणते उपाय करता येतील? याच दृष्टीने संशोधकाला सदर समस्येची गरज वाटली.

त्याचबरोबर काही माध्यमिक शाळेतील शिक्षकांशी व सहकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अध्यापनातून अल्प प्रमाणात प्रयत्न केले जातात. अनेक समस्या असलेल्याही दिसून आल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात विद्यार्थ्यांमध्ये प्राथमिक, माध्यमिक स्तरावरच भौगोलिक दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. त्यासाठी अध्यापनाशिवाय इतर वेळी भौगोलिक दृष्टिकोन कसा विकसित करता येईल? विकसित करण्यामधल्या समस्या कशा सोडविता येतील. या दृष्टीने सदर संशोधन करणे गरजेचे वाटते.

**३.२ महत्त्व :**

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यादृष्टीने शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये भूगोल विषयाविषयी आवड निर्माण करण्यासाठी सदर संशोधन महत्त्वाचे ठरेल. तसेच भूगोल विषयातील संकल्पना, सिद्धांत, घटना, संता, संबोध, नियम, चिन्हे, परिभाषा, तत्त्वे इत्यादींचा उपयोग दैनंदिन जीवनात होतो त्याच बरोबर भूगोल विषयामुळे संबंधित कौशल्य प्राप्त करणे, स्वयंअभ्यास, पृथ्थकरण, चिकित्सक मूल्यमापन, अभिरुची निर्माण करणे, साहित्य निर्मिती करणे, नियमित व कठोर परिश्रम करण्याची सवय, समस्या निराकरण, प्रयोग व सर्वेक्षण करणे, अर्थ लावणे, अंदाज करणे, परिकल्पनेची सत्यता पडताळून पहाणे, सांस्कृतिक पार्श्वभूमी व विकासाबाबत योग्य दृष्टिकोन विकसित होणे. तसेच भौगोलिक घटना किंवा समस्या यांच्याशी संबंधित माहिती मिळविणे, तक्ते, नकाशा, आकृत्या, आलेख इ. चे लेखन व वाचन करणे, इ. गुणांमुळे भौगोलिक दृष्टिकोन विकसित होतो हे लक्षात येईल.

माध्यमिक स्तरावरील शिक्षक आपल्या अध्यापनात जास्तीत जास्त प्रात्याक्षिक, दृक श्राव्य माध्यमांचा वापर, कृतीशीलता, प्रयोगशीलता क्षेत्रभेटीचा वापर करतील. तसेच भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी कोणते उपक्रम राबवायचे? उपक्रम राबवित असताना कोणत्या समस्या येतात? त्या समस्या कशा सोडवायच्या याविषयी मार्गदर्शन मिळेल. उपक्रमांचे महत्त्व लक्षात येईल. माध्यमिक शाळेतील शिक्षक भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतील.

थोडक्यात विद्यार्थ्यांमध्ये कृतिशीलता, प्रयोगशीलता, स्वयंअध्ययन, सहकार्यभावना, समस्या निराकरणाची अचूक सवय, तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्याची कारणमीमांसा करण्याची सवय, श्रम करण्याची सवय, फरक करणे, विधानातील चुका शोधणे, वर्गीकरण करणे, साम्य व भेद ओळखणे, परस्पर संबंध ओळखणे, अनेक भौगोलिक वास्तविकतेशी निगडित उदाहरणे देणे, समस्येचे पृथक्करण करणे, प्रयोग, सर्वेक्षण निष्कर्ष, अंदाज काढून परिकल्पनेची

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

सत्यता पडताळून पहाणे त्यावर विश्वास ठेवणे हे गुण विकसित होण्यासाठी भौगोलिक दृष्टिकोन जोपासण्याची आवश्यकता आहे. हे शिक्षक, मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षक यांना समजण्यास मदत होईल.

माध्यमिक शिक्षण हे शालेय शिक्षणातील अंतिम टप्पा आहे. या टप्प्यावरच उच्च माध्यमिक शिक्षणा व उच्च शिक्षणाची तयारी व मूलभूत ज्ञान दिले जाते. त्यामुळे या स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक विकास होवून स्वतःच्या व समाजाच्या समस्या सोडविण्याची सवय विकसित होईल. तसेच आजचे विद्यार्थी हे देशाचे भावी आधारस्तंभ आहेत यातूनच देशाचे भावी संशोधक शास्त्रज्ञ, भूगोल तज्ज्ञ तयार होणार आहेत. त्यासाठी सदर संशोधन उपयुक्त ठरेल.

**४) संशोधन समस्या विधान :**

प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक संशोधनाच्या 'भूगोल शिक्षण' या विषय क्षेत्राशी संबंधित आहे.

**५) समस्या शीर्षक :**

पुणे शहरातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचा अभ्यास व उपाय.

**६) कार्यात्मक व्याख्या :**

- **पुणे शहर :**

महाराष्ट्रातील शिक्षणाचे माहेरघर व सांस्कृतिक केंद्र म्हणून प्रसिद्ध शहर.

- **माध्यमिक शाळा :**

१९८६ च्या राष्ट्रीय धोरणानुसार ज्या शाळेमध्ये ९ व १० वर्ग चालविले जातात अशी शाळा.

- **माध्यमिक शाळेतील विद्यार्थी :**

१९८६ च्या राष्ट्रीय धोरणानुसार सरासरी १४ ते १६ वयोगटातील इ. ९ वी व इ. १० वी मध्ये अध्ययन करणारे विद्यार्थी.

- **भौगोलिक दृष्टिकोन :**

प्रयोगशील वृत्ती जोपासणे, तर्कशुद्ध पद्धतीने व चिकित्सक वृत्तीने कारणमीमांसा करणे, परिकल्पनेची सत्यता पडताळून पहाणे, अंदाज, निष्कर्ष, निरिक्षण, सर्वेक्षण करणे, भौगोलिक तत्त्वंचा उपयोग करुन समस्या ओळखणे व तिचे पृथक्करण करणे म्हणजे भौगोलिक दृष्टिकोन होय.

- **उपक्रम :**

विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविले जाणारे कार्यक्रम.

उदा. भूगोल प्रश्नमंजुषा, भौगोलिक सहल, क्षेत्रभेट, भौगोलिक छंद

**७) संशोधनाची उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती घेणे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

२) सदर उपक्रम राबविताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

३) भौगोलिक दृष्टिकोन विकसित करताना येणाऱ्या समस्यांवर उपाय सुचविणे.

**८) संशोधनाची गृहितके :**

१) माध्यमिक शाळेतील शिक्षक अध्यापन करतेवेळी भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी वेगवेगळे अध्यापन अनुभव देतात.

२) माध्यमिक शाळेतील शिक्षक भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवितात.

**९) संशोधन प्रश्न :**

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी कोणकोणते उपक्रम राबवितात?

**१०) व्याप्ती व मर्यादा व परिमर्यादा :**

**१०.१ व्याप्ती :**

सदर संशोधन पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळा व माध्यमिक शाळेतील शिक्षकांशी संबंधित आहे.

**१०.२ मर्यादा :**

सदर संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादांवर अवलंबून आहेत.

**१०.३ परिमर्यादा :**

१) सदर संशोधन हे पुणे शहरातील टिळक रोड, सहकारनगर, कात्रज प्रभागातील माध्यमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.

२) सदर संशोधन हे या माध्यमिक शाळेतील शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.

३) सदर संशोधन हे भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम, ते राबविताना येणाऱ्या समस्या व उपाय या पुरतेच मर्यादित आहे.

**११) जनसंख्या व न्यादर्श :**

**११.१ जनसंख्या :**

पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक.

**११.२ न्यादर्श :**

असंभाव्यता सहेतुक निवड पद्धतीने १० शाळेतील ५० शिक्षक.

**१२) संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षणाचा वापर केला आहे.

**१३) माहिती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर केला आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**१४) संख्याशास्त्रीय तंत्रे :**

प्रस्तुत संशोधनामध्ये संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थविवेचन करण्यासाठी शेकडेवारी या तंत्राचा वापर केला आहे.

**१५) संशोधन कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली तयार केली. सदर प्रश्नावली १० माध्यमिक शाळेतील ५० शिक्षकांकडून भरुन घेण्यात आली. तसेच १० अनुभवी शिक्षकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. संकलित माहितीचे विश्लेषण करुन अर्थनिर्वचन केले व निष्कर्ष काढले.

स्वयंअध्ययन
↓
समस्या निवड
↓
संशोधन आराखडा
↓
प्रश्नावलीची निर्मिती
↓
न्यादर्श निवड
↓
प्रश्नवलीच्या सहाय्याने माहिती संकलन (५० शिक्षक)
↓
मुलाखतीद्वारे माहिती संकलन (१० शिक्षक)
↓
माहितीचे विश्लेषण
↓
निष्कर्ष व अहवाललेखन

**माहितीचे विश्लेषण :**

| अ.क्र. | प्रश्न/उपक्रम | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | उपक्रम राबवितात | ५० | १०० |
| २. | भूगोल तज्ज्ञ/संशोधक/शास्त्रज्ञ परिचय व माहिती देणे. | ५० | १०० |
| ३. | संशोधक शास्त्रज्ञ, भूगोल तज्ज्ञ भेटी व चर्चा | ३० | ६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | भौगोलिक घटनांची माहिती | ५० | १०० |
| ५. | भूगोल पुस्तके / मासिके / संदर्भ ग्रंथ/ नियतकालिके | ४० | ८० |
| ६. | वर्तमानपत्रातील कात्रणांचा संग्रह व वाचन | ४० | ८० |
| ७. | नमुन गोळा करणे, भूगोल छंद | ४० | ८० |
| ८. | भूगोल विभाग / भूगोल मंडळ स्थापना | ५० | १०० |
| ९. | टाकाऊपासून टिकाऊंची निर्मिती | ४० | ८० |
| १०. | भूगोल प्रश्नमंजुषा | ५० | १०० |
| ११. | भूगोल प्रकल्प | ५० | १०० |
| १२. | निबंध लेखन | ४० | ८० |
| १३. | भूगोल प्रदर्शन | ५० | १०० |
| १४. | प्रात्याक्षिक / कृती / प्रयोगावर जास्त भर | ४५ | ९० |
| १५. | भूगोल चर्चा व परिसंवाद | २० | ४० |
| १६. | भौगोलिक क्षेत्रभेट | २५ | ५० |
| १७. | भौगोलिक सहली | २० | ४० |
| १८. | वेळेचा अभाव | ५० | १०० |
| १९. | विद्यार्थी व पालक उत्साहाचा अभाव | ४० | ८० |
| २०. | भूगोल स्वतंत्र खोली / साहित्याचा अभाव | ४५ | ९० |
| २१. | इतर शिक्षकांचे सहकार्याचा अभाव | २० | ४० |
| २२. | वेळापत्रकात तासाची तरतूद | ५० | १०० |
| २३. | उपक्रमासंदर्भात प्रशिक्षण | ५० | १०० |
| २४. | विद्यार्थी व पालकांचे उद्बोधन | ५० | १०० |
| २५. | केलेल्या कामाची दखल | ५० | १०० |

**१६) निष्कर्ष :**

१. सर्व माध्यमिक शाळेतील शिक्षक भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी उपक्रम राबवितात.

२. भूगोल तज्ज्ञ/ शास्त्रज्ञांचा परिचय व माहिती देणे, भौगोलिक घटकांची माहिती सांगणे, भूगोल प्रश्नमंजूषा आयोजित करणे, वैयक्तिक व सामूहिक प्रकल्प / उपक्रम राबविणे, भूगोल प्रदर्शन भरविणे व प्रदर्शनात सहभागी होणे असे उपक्रम सर्वच शिक्षक राबवितात.

३. भूगोल तज्ज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या भेटी व त्यांच्याशी चर्चा करणे, स्वतंत्र खोली, साहित्य, भूगोल चर्चा व परिसंवाद आयोजित करणे व तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणे असे उपक्रम राबविल्याचे प्रमाण फारच कमी आहे.

४. भौगोलिक सहली व क्षेत्रभेट, भूगोल विभाग, भूगोल मंडळाची स्थापना असे उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण निम्म्यापेक्षा कमी आहे.

५. भूगोल मासिके नियतकालिके, संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देणे, वर्तमानपत्रातील कात्रणांचा संग्रह करणे, नमुने करणे, भौगोलिक छंद जोपासणे, टाकाऊपासून टिकाऊची निर्मिती, निबंध स्पर्धा आयोजित करणे व प्रात्याक्षिकांवर भर देणे असे उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण निम्म्यापेक्षा जास्त आहे.

६. वेळ कमी असतो. स्वतंत्रवर्ग खोली, साहित्य व सुविधा कमी असणे, इतर शिक्षकांचे सहकार्य न मिळणे, केलेल्या कामाची दखल न घेणे विद्यार्थी व पालकांची मदत व सहकार्य कमी असणे अशा समस्या सर्वच शिक्षकांना येतात.

७. वेळापत्रकामध्ये वेगळ्या तासिकेची सोय करणे, विद्यार्थी बालक व शिक्षकांचे उद्‌बोधन करणे, उपक्रमांसंबंधी माहिती व प्रशिक्षण मिळणे, वेळोवेळी कामाची दखल घेणे असे उपाय करता येतील असे सर्वच शिक्षकांचे मत आहे.

**१७) शिफारशी :**

**१७.१ शाळा व मुख्याध्यापकांसाठी :**

१. शाळेतील भूगोल स्वतंत्र खोली सुसज्ज करावी. शालेय ग्रंथालयात भूगोलविषयाची अद्ययावत ॲटलास, पुस्तके, मासिके, नियतकालिके उपलब्ध करावीत.

२. शाळेत भूगोल विभागात शैक्षणिक साहित्य, सुविधा नकाशे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करावीत.

३. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच सर्व उपक्रम राबविण्याचे नियोजन करावे.

४. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी उपक्रमांसंदर्भात उद्‌बोधन आयोजित करावे.

५. शिक्षकांना भौगोलिक दृष्टिकोन संदर्भात उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहन व प्रेरणा द्यावी.

६. शाळेतील शिक्षकांसाठी उपक्रम राबविण्यासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करावे.

७. वर्षभर शाळेत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांसाठी शाळेच्या वार्षिक अंदाजपत्रकात खर्चाची तरतूद करावी.

८. विद्यार्थी व शिक्षकांसाठी वर्षभर ग्रंथालय व प्रयोगशाळा जास्तीत जास्त वेळ उपलब्ध करण्याचे प्रयत्न करावेत.

९. शाळेच्या वेळापत्रकात उपक्रमांसाठी तासिका उपलब्ध कराव्यात.

**१७.२ शिक्षकांसाठी :**

१. शाळेत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन वर्षाच्या सुरुवातीलाच करावे.

२. विद्यार्थी व पालक यांच्यासाठी उपक्रमांसंदर्भात उद्‌बोधन वर्ग आयोजित करावे.

३. भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी अध्यापनामध्ये जास्तीत जास्त प्रात्याक्षिक आणि दृकश्राव्य माध्यमांवर अधिक भर द्यावा.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी शाळेत जास्तीत जास्त उपक्रम राबवावेत.

५. विद्यार्थ्यांना भूगोल विषयाची आवड निर्माण व्हावी म्हणून जास्तीत जास्त प्रात्याक्षिके करण्याची संधी द्यावी.

६. विद्यार्थ्यांना उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन द्यावे.

**१८. समारोप :**

थोडक्यात, माध्यमिक शिक्षण हे उच्चशिक्षणाचा पाया आहे. माध्यमिक स्तरावर सर्व प्रकारचे मूलभूत ज्ञान दिले जाते. या स्तरावरच भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी शाळांतर्गत व शाळाबाह्य उपक्रम राबविण्याची गरज आहे. या स्तरावर वेगवेगळे उपक्रम राबविण्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भूगोल विषयाबद्दल आवड निर्माण होईल, त्यामुळे कृतीशीलता प्रयोगशीलता, तर्कशुद्ध विचार पद्धती, परिकल्पनांची सत्यता पडताळा करुन स्वीकार करणे. या सवयी विकसित होतील व भौगोलिक दृष्टिकोन विकसित होईल. विद्यार्थी हे देशाचे भावी आधारस्तंभ आहेत. यांच्यातून भावी भूगोल शिक्षणतज्ज्ञ, शास्त्रज्ञ, संशोधक, निर्माण होतील. त्यासाठी सर्व शिक्षकांनी भौगोलिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी जास्तीत जास्त उपक्रम शाळांमध्ये राबवावेत.

**१९) संदर्भग्रंथ :**

*डॉ. एम. आर. जाधव, (२००५) भूगोल अध्यापन पद्धती – एक दृष्टिक्षेप, कोल्हापूर : चैतन्य प्रकाशन.*
*मूल्यांचे शिक्षण – शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.*
*मराठी विश्वकोष – खंड १६, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई*
*प्राथमिक शिक्षण स्तरावरील कृतिसंवर्धन, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.*
*शिक्षण संक्रमण, (मे २००४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.*
*भिंताडे, वि. रा. (२००७) शैक्षणिक संशोधनाची पद्धती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*
*घोरमोडे, के. यु. (२००८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर : विद्या प्रकाशन.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*